**पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३,**
**पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय**
**पत्ता- भोसरी एम.आय.डी.सी पो.स्टे. इमारत दुसरा मजला,**
**स्पाईन रोड, भोसरी पुणे.**

**प्रेस नोट** **दिनांक १९/१०/२०२४**

## ए.टी.एम.मशिन फोडुन चोरी करणारे चोरटयांचा सिने स्टाईल पाठलाग
## महाळुंगे पोलीसांची कामगिरी : स्कार्पिओ व रोख ११ लाख ५२ हजार रुपयांचा मुद्देमाल टाकुन चोरटे पसार

---

मा.श्री.विनय कुमार चौबे, पोलीस आयुक्त सो पिंपरी चिंचवड यांनी औद्योगिक क्षेत्रातील मालमत्तेच्या गुन्हयांचा आळा घालणे करीता आणि आगामी विधानसभा निवडणुकीचे अनुषंगाने कोणताही अनुचित प्रकार घडु नये याकरीता सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना सतर्क कर्तव्य करणे बाबत मार्गदर्शन करुन सुचना दिलेल्या आहेत. त्या अनुषंगाने महाळुंगे पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री नितीन गिते यांनी रात्रीची गस्त व इतर कारवाई अधिपत्त्याखालील अधिकारी व अंमलदार यांचे सहाय्याने प्रभावीपणे सुरु केलेल्या आहेत.

दि १९/१०/२०२४ रोजी मध्यरात्री ०२:०० वा चे सुमारास चाकण व महाळुंगे पोलीस ठाणे हद्दीवरील बिरदवडी फाटा येथील हिताची कंपनीचे ए.टी.एम.मशिन फोडुन त्यातील रक्कम चोरली जात असल्याची माहिती महाळुंगे एम.आय.डी.सी. पोलीस ठाणे अंमलदार पोहवा/होळकर यांना प्राप्त होताच त्यांनी रात्रगस्तीचे सर्व अधिकारी व अंमलदार यांना सतर्क केले. पोलीस अंमलदार युवराज बिराजदार व अमोल माटे यांनी घटनास्थळी भेट देवुन माहिती घेत असताना त्यांना एक संशयीत काळे रंगाची स्कार्पिओ बिरदवडी-वाकी रोडने गेल्याचे समजले. पोहवा/बिराजदार व माटे यांनी सरकारी वाहनातुन संशयीत काळे रंगाचे स्कार्पिओ गाडीचा शोध घेत असताना रोडलगत अंधारात वीटभट्टीचे जवळ संशयीत काळे रंगाची स्कार्पिओ थांबलेली दिसुन आल्याने पोहवा/बिराजदार व माटे हे स्कार्पिओचे दिशेने जात असताना स्कार्पिओ गाडीतील अनोळखी चोरटयांनी गाडी चालु करुन पोलीस गाडीस समोरुन धडक देवुन पळ काढला. पोहवा/बिराजदार व माटे यांनी स्कार्पिओ गाडीचा पाठलाग चालु करुन सर्वांना सतर्क केले. स्कार्पिओ गाडी बिरदवडी-वाघजाई फाटा चे दिशेने येत असल्याने तेथे पोलीस उपनिरीक्षक जितेंद्र परदेशी, पोलीस उपनिरीक्षक दत्ता जाधव, पोहवा/चाफळे, काळे, लोखंडे, खांडेकर, शिंदे यांनी वाहने अडवी लावुन स्कार्पिओ अडविण्याचा प्रयत्न केला. तेव्हा चोरटयांनी स्कार्पिओ गाडी चाकणचे दिशेने वळविली. चाकणचे आंबेठाण चौकामध्ये नाकाबंदी करीत असणारे पोहवा/गभाले व गणेश गायकवाड यांना माहिती मिळताच त्यांनी रोडवर कंटेनर अडवा उभा करुन रस्ता ब्लॉक केल्याने चोरटयांनी पुन्हा गाडी आंबेठाण बाजुला वळविली. त्या दरम्यान पाठलाग करणारे पोहवा/बिराजदार व अमोल माटे हे समोरुन सरकारी गाडीतुन आडवे आल्याने चोरटयांनी आंबेठाण रोडलगतचे झित्राइमळा येथे एका गल्लीमध्ये स्कार्पिओ गाडी घातली. त्यांचे मागे पोहवा/बिराजदार व अमोल माटे यांनी सरकारी वाहन घातल्याने चोरटयांना पुढे अरुंद गल्लीमधुन स्कार्पिओ नेणे शक्य न झाल्याने स्कार्पिओ मधील ५ ते ६ चोरटयांनी स्कार्पिओ, त्यातील ए.टी.एम.फोडीचे साहित्य गॅस कटर, सिलेंडर, एटीएम मशिन ओढण्यासाठीचे बेल्ट,व ए.टी.एम.मधील चोरलेले रोख १० लाख ५२ हजार रुपये असे जागीच सोडुन धुम ठोकली. सदर ए.टी.एम.चोरटयांचा परिसरात शोध घेण्यात आला मात्र रात्रीचे अंधार व शेतीचे मोकळे परिसरचा फायदा घेवुन चोरटे अंधारात पसार झाले. महाळुंगे पोलीस ठाण्याचे अधिकारी व अंमलदार यांच्या जलद प्रतिसादामुळे चोरटे ए.टी.एम. मधील रक्कम घेवुन जावु शकले नाहीत. व गंभीर गुन्हयास काहीअंशी प्रतिबंध करता आला.

सदर ए.टी.एम.चोरीचे संदर्भाने चाकण पोलीस ठाणेमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक धायगुडे चाकण पोलीस स्टेशन हे करत आहेत.

सदरची उल्लेखन्नीय कामगिरी कारवाई मा.पोलीस आयुक्त **श्री.विनय कुमार चौबे,** मा.सह पोलीस आयुक्त **डॉ.शशिकांत महावरकर,** मा.अपर पोलीस आयुक्त **श्री.वसंत परदेशी,** मा.पोलीस उप-आयुक्त, गुन्हे शाखा **श्री.संदिप डोईफोडे,** मा.पोलीस उप-आयुक्त परिमंडळ-३ **डॉ.शिवाजी पवार,** सहाय्यक पोलीस आयुक्त, चाकण विभाग **श्री.राजेंद्रसिंह गौर,** सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे-२) **श्री बाळासाहेब कोपनर,** यांचे सुचना व मार्गदर्शनानुसार महाळुंगे पोलीस स्टेशनचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक **श्री नितीन गिते** यांचे अधिपत्त्याखाली पोलीस उपनिरीक्षक **श्री जितेंद्र परदेशी, दत्तात्रय जाधव,** पोलीस अंमलदार **संतोष होळकर, युवराज बिराजदार, अशोक शेळके, पप्पु लोखंडे, अशोक गभाले, विश्वास पाटील, प्रकाश चाफळे, संतोष काळे, शिवाजी लोखंडे, गणेश गायकवाड, अमोल माटे, तेजस खांडेकर, रामहरि शिंदे** यांनी केली आहे.

**( डॉ.शिवाजी पवार )**
पोलीस उप-आयुक्त
परिमंडळ-३, पिंपरी चिंचवड